24

# तेविसावी
# आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद, पुणे

# देश आणि विदेशातील विविध क्षेत्रातील पुरुष कर्तृत्वाचे योगदान

# The Contribution and Achievements of Men in Various Spheres at National and Internatonal Levels

संपादक

● लुदमिला सेकाचेव्हा ● डॉ. विठ्ठल शिवणकर ● डॉ. स्नेहल तावरे
● डॉ. एल.डी. कदम ● डॉ. शिवलिंग मेनकुदळे ● डॉ. संजय नगरकर

स्नेहवर्धन प्रकाशन
पुणे

All rights reserved. No part of this publication may be reproduced, stored in or introduced into a retrieval system or transmitted in any form or by any means (electrical, mechanical, photocopying, recording or otherwise) without the prior written permission of the author or publisher. Any person who does any unauthorized act in relation to this publication may be liable to criminal prosecution and civil claims for damages.


- स्नेहवर्धन प्रकाशन क्र : १४०८


- देश आणि विदेशातील विविध क्षेत्रातील पुरुष कर्तृत्वाचे योगदान
  The Contribution and Achievements of Men in Various Spheres at National and Internatonal Levels


- **प्रकाशक आणि मुद्रक :**
  डॉ. स्नेहल तावरे
  स्नेहवर्धन, ८६३ सदाशिव पेठ, महात्मा फुले सभागृहामागे,
  पुणे ४११०३०.
  स्थिरसंवाद : (०२०) २४४७ २५ ४९ / २४४३ ६९ ६१
  भ्रमणसंवाद : ९४२३६४३१३१ / ९०७५०८१८८८
  ई मेल : snehaltawre@gmail.com



- © S.R.I.



- **प्रथमावृत्ती :** १७ डिसेंबर २०२२
  २३ वी आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद, पुणे
- **मुखपृष्ठ :** संतोष धोंगडे
- **अक्षरजुळणी व मुद्रणस्थळ :** स्मिता टाइपसेटर्स, पुणे ३०
- ISBN 978 - 93 - 91033 - 52 - 1
- **पृष्ठसंख्या :** ...
- **मूल्य :** ₹ .../- $ ..

*वैश्विक पातळीवर विविध प्रकारच्या भूमिका*
*यशस्वीरित्या करणाऱ्या, चैतन्यमयी असणाऱ्या,*
*आपल्या कार्यकर्तृत्वाची मोहोर उमटविणाऱ्या*
***सर्व पुरुष कर्तृत्वांना....***
*आदरपूर्वक सस्नेह अर्पण.*

**– संपादक**

## अनुक्रमणिका


- पुरुष कर्तृत्वाच्या निमित्ताने... – **संपादक** / ७

१. भारतीय हरितक्रांतीचे शिल्पकार डॉ.एम.एस.स्वामीनाथन **प्रा. डॉ. सुप्रिया खोले** / ९

२. पत्रकार आणि साहित्यिक उत्तम कांबळे **प्रा. डॉ.सिंधू आवळे** / १३

३. डॉ.सिग्मंड फ्रॉईड यांचे मानसशास्त्रातील मनोविश्लेषणाबाबत योगदान **प्रा. मिलिंद पाटील** / १७

४. शाहू महाराज आणि महिला सक्षमीकरण **प्रा. एम. के. कन्नाडे** / २२

५. समाज सुधारक – हमीद दलवाई सामाजिक सुधारणेतील योगदान **प्रा. एस. पी. मुलाणी** / २७

६. राहुल सांकृत्यायन का कथा साहित्य – राजनीतिक चेतना **लेफ्टनंट डॉ. रविंद्र पाटील** / ३१

7. The Impact and Contribution of Peter Drucker on Management Theory **Dr. Sampada Lavekar / 36**

8. Olympian Wrestler Khashaba Jadhav **Dr. Vikramsinh Nangare / 40**

9. Contribution of Alexander Von Humboldt to the development of Modern Geography **Dr. B. B. Ghurake / 44**

10. Dmitri Mendeleev- The King of Periodic Table **Dr. Kishor Gaikwad / 48**

11. Contribution and Achicvement of Friedrich Ratzel for the Development of Modern Human Geography **Dr. M. D. Kadam / 52**

12. Contribution of Michael Faraday in the field of Science **Dr. Samadhan Pawar / 56**

# शाहू महाराज आणि महिला सक्षमीकरण

**– प्रा. एम. के. कन्नाडे**

शाहू महाराजांनी शिक्षणाच्या क्षेत्रात जे मूलगामी धडाडीचे धोरण अमलात आणले होते, त्याची मधुर फळे त्यांच्याच कारकीर्दीत त्यांच्या प्रजाजनांना चाखावयास मिळाली. प्राथमिक स्तरांवरील विद्यार्थिसंख्या मोठ्या संख्येने वाढत गेली. शाहू महाराजांच्या शैक्षणिक धोरणाचे परिणाम केवळ कोल्हापूर संस्थान व त्यांची कारकीर्द यापुरतेच मर्यादित राहिले नाहीत. परिणामी, महाराष्ट्रात बहुजन समाजाचा एक अपूर्व सामाजिक अभ्युदय घडून आला. त्याचबरोबर समाजाची एक प्रागतिक सामाजिक मानसिकता तयार झाली. या सर्व प्रगतीची मुळे म. फुले व राजर्षी शाहू महाराज यांच्या विचारांत आणि कृतींत आहेत, हे विसरून चालणार नाही.

**महिला सक्षमीकरण आणि कायदे –**

प्राचीन काळापासून ते आजपर्यंत आपली संस्कृती ही पुरुषप्रधान संस्कृती आहे. त्यामध्ये स्त्री वर्गाला दुय्यम वागणूक दिली जाते. ती परावलंबी तर आहेतच शिवाय बालविवाह, पुनर्विवाह प्रतिबंध, केशवपन, शिक्षणबंदी, पडदापद्धती अशा अनेक रूढींनी तिला असाहाय्य बनवले होते. तिच्यावर होणाऱ्या अन्याय, अत्याचाराला वाचा फोडण्याचे कार्य महात्मा फुल्यांपासून आगरकरांपर्यंत अनेक समाजसुधारकांनी केले होते.

शिक्षणाशिवाय स्त्री सबल व सक्षम होणार नाही, हे जाणून म. फुल्यांनी स्त्री–शिक्षणाची चळवळ सुरू केली होती. शाहू महाराजांनीही आपल्या संस्थानात स्त्री शिक्षणास प्रोत्साहन तर दिलेच, शिवाय तिच्या नैसर्गिक हक्कांचे संरक्षण करणारे अनेक कायदेही अमलात आणून तिची समाजाकडून आणि कुटुंबाकडून होणारी पिळवणूक थांबविण्याचे आणि तिला सक्षम करण्याचे अनेक कायदे केले. त्याचा थोडक्यात आढावा खालीलप्रमाणे.

**विधवा–पुनर्विवाह कायदा –**

मागासलेल्या समाजातील अनेक जातींमध्ये विधवांना पुनर्विवाह करण्याचे स्वातंत्र्य होते. पण, स्वतःला उच्चवर्णीय व सुसंस्कृत समजल्या जाणाऱ्या जातींमध्ये मात्र विधवांना पुनर्विवाह तर करता येत नव्हताच, शिवाय त्यांना केशवपनासारख्या

अत्यंत क्रूर अशा रूढीखाली अत्यंत दुःखी व उपेक्षित जीवन जगावे लागत होते. अशा समाजातील एखाद्या विधवेने पुनर्विवाह करण्याचे धाडस दाखवले, तर त्यास समाजमान्यताच नव्हे, तर कायद्याचीही मान्यता नव्हती. म्हणजे असा विवाह हा बेकायदेशीर ठरून त्यापासून होणारी संतती ही अनौरस समजली जात होती. शाहू महाराजांनी जुलै १९१७ मध्ये आपल्या संस्थानात विधवांच्या पुनर्विवाहास कायदेशीर मान्यता देणारा कायदा संमत केला. विधवांच्या पुनर्विवाहाच्या बाबतीत ज्या अनेक अडचणी निर्माण होत होत्या, त्या या कायद्यान्वये दूर करण्यात आल्या; तसेच या कायद्यानुसार विवाहाची कायदेशीर नोंद करण्याची पद्धती सुरू केली गेली. त्यामुळे विवाहविधीचा कायदेशीर पुरावा अस्तित्वात राहू शकल्याने, स्त्रीवर्गावर होणाऱ्या संभाव्य अन्यायाचा प्रतिकार करण्याचे साधन त्यांना उपलब्ध करून दिले गेले.

**पडदापद्धतीचा निषेध –**

महाराष्ट्रातील उच्चवर्णीयांत, विशेषतः राजघराणी, मराठा सरदार व वतनदार घराणी यांच्यामध्ये पडदापद्धती सर्वत्र रूढ होती. ही पद्धत स्त्रियांच्या मधील स्वाभाविक गुणांचा उत्कर्ष दडपणारी रूढी आहे, असे शाहू महाराजांचे स्पष्ट मत होते. पडदा पद्धतीला कडकडून विरोध केला.

**आंतरजातीय विवाह कायदा –**

१२ जुलै १९१९ रोजी, हा कायदा कोल्हापूर गॅझेटमध्ये प्रसिद्ध झाला. त्या अन्वये संस्थानातील हिंदू व जैन या दोन मुख्य धर्मांच्या लोकांना जातिनिर्बंध न पाळता सदरहू दोहोंपैकी आपापल्या कोणत्याही धर्माच्या मनुष्याशी विवाह करण्याची मुभा दिली गेली. या कायद्याच्या एका कलमान्वये, विवाहकाली पुरुषाचे वय १८ वर्षे पूर्ण व स्त्रीचे वय १४ वर्षे पूर्ण असले पाहिजे, असा निर्बंध घातला गेला. त्या काळात बालविवाह पद्धती सर्वत्र रूढ होती व मुलींचे विवाह सर्वसाधारणपणे १० वर्षांच्या आतच केले जात होते. ब्रिटिश सरकारने १८९१ साली मोठ्या धाडसाने 'संमती वयाचा कायदा' मंजूर करून विवाहोत्तर 'मुलीचे संभोग वय किमान दहाऐवजी बारा' वर्षे असावे, असा दंडक घातला होता. तथापि, या बारा वर्षे वाढीव वयाचा दंडक हिंदू धर्माचारात ढवळाढवळ करणारा आहे, अशी भूमिका लो. टिळकादी परंपरानिष्ठांनी घेऊन त्यास मोठा विरोध केला होता. या पार्श्वभूमीवर विवाहप्रसंगी मुलीचे वय किमान चौदा असावे, असे सांगणारा शाहू महाराजांचा कायदा ब्रिटिशांच्या कायद्याहून अधिक पुरोगामी होता, हे स्पष्ट आहे.

या कायद्यात आणखी एक अत्यंत महत्त्वाचे कलम आहे. त्याअन्वये १८ वर्षे पूर्ण झालेल्या स्त्रीला, विवाहासाठी पित्याची अथवा पालकाची संमती

आवश्यक असणार नाही. स्त्रीला आपला जन्माचा जोडीदार निवडण्याचे स्वातंत्र्य देणारे हे मोठे वैशिष्ट्यपूर्ण कलम होते, तसेच या कायद्याखाली होणाऱ्या विवाहाची रीतसर नोंदणीही होणार होती. अशाप्रकारे त्या कालाच्या मर्यादा लक्षात घेतल्या, तर प्रस्तुतचा कायदा म्हणजे स्त्री-पुरुषांच्या सामाजिक स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारे महाराजांचे एक क्रांतिकारी पाऊल होते.

अशाप्रकारे नव्या कायद्यानुसार झालेल्या आंतरजातीय लग्नास कायदेशीर मान्यता देण्यासाठी, शाहू महाराजांनी एक खास 'विवाह नोंदणी अधिकारी' नियुक्त केला होता.

**क्रूरपणाच्या वर्तनास प्रतिबंध करणारा कायदा –**

अनेक कुटुंबांत स्त्रियांचा नवरा व त्याचे नातलग यांच्याकडून स्त्रियांचे छळ होत असत. काही छळ असे असत की, अपराध्यास 'इंडियन पीनल कोड' सुद्धा काही शिक्षा करू शकत नसे. शाहू महाराजांच्या निरीक्षणातून स्त्रियांवर होणारे कौटुंबिक अत्याचार सुटलेले नव्हते. त्याला प्रतिबंध करण्यासाठी त्यांनी २ ऑगस्ट १९१९ रोजी आपल्या संस्थानच्या गॅझेटमध्ये प्रसिद्ध केला. एकूण ११ कलमांच्या या कायद्यान्वये, स्त्रीला क्रूरपणाची वागणूक देणाऱ्या अपराध्यास ६ महिन्यांचा कारावास व २०० रुपयांपर्यंत दंड, अशी शिक्षा देण्याची तरतूद केली गेली होती.

**घटस्फोटाचा व वारसाचा कायदा –**

शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात घटस्फोटासंबंधीचा कायदा अमलात आणला. त्यामध्ये स्त्रीच्या हक्कांचे संरक्षण कसे होईल, घटस्फोटानंतर तिच्या अन्नवस्त्राच्या खर्चाची योग्य ती व्यवस्था कशी केली जाईल; याकडे लक्ष ठेवून कायद्याची तशी कलमे तयार केली होती. तसेच वैवाहिक संतती असेल, तर त्यांच्या ताब्याबद्दलची, पोटगीबद्दलची व शिक्षणाबद्दलची व्यवस्थाही या कायद्याने लावली गेली.

या कायद्यातील एक महत्त्वाची तरतूद अशी की, काही जातींमध्ये जातपंचायतीला घटस्फोटाचे अधिकार होते, ते अधिकार या कायद्याने काढून घेतले गेले. जातपंचायतीच्या लहरीवर आधारलेला, प्रसंगी स्त्रीवर अन्याय करणारा घटस्फोट अमान्य केला गेला.

१९२० च्या जानेवारीत, वारसा हक्काच्या कायद्यात महत्त्वाच्या दुरुस्त्या केल्या गेल्या. या दुरुस्ती कायद्यानुसार, शूद्राची अनौरस संतती व ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य या तीन वरिष्ठ वर्णांची अनौरस संतती, यांना मिळणाऱ्या वारसाहक्कांतील फरक काढून टाकला गेला. सर्व वर्णांच्या अनौरस संततींना, जनक बापाच्या मिळकतीत वारसा हक्क दिला गेला. याच कायद्याचे दुसरे कलम, पतित स्त्रियांच्या

उद्धाराच्या दृष्टीने महत्त्वाचे होते.

**देवदासी प्रथा प्रतिबंध कायदा –**

देवाच्या नावावर म्हणून मुली सोडण्याच्या रूढीतून देवदासी वर्ग निर्माण होत असे. या देवदासींमध्ये जोगतीण, मुरळी, भावीण असे अनेक प्रकार असत. हा एकप्रकारे पतित स्त्रियांचा दुर्दैवी वर्ग होता. अस्पृश्यतेप्रमाणेच देवदासी प्रथा हा हिंदू समाजावरील कलंक होता. तो दूर करण्यासाठी शाहू महाराजांनी १७ जानेवारी १९२०मध्ये एक खास कायदा केला.

जेव्हा या मुली देवाच्या नावाने सोडल्या जात, तेव्हा त्या सर्वार्थाने देवाच्या बनत. जनक घराशी त्यांचा काही संबंध राहात नसे, तसेच जनक आईबापाच्या मिळकतीत त्यांचा काही वारसाहक्क राहात नसे; पण त्याचबरोबर, देवाला सोडल्यामुळे संबंधित देवस्थानात तिला काही परंपरेने चालत आलेले विशिष्ट हक्क मिळत असत आणि एक प्रकारचा विशिष्ट असा, कायद्याच्या दृष्टीने सामाजिक दर्जाही प्राप्त होत असे. आता हे हक्क व दर्जा कितीही हीन प्रकारचा असला, तरी त्याला समाजाची व परंपरेची मान्यता होती. महाराजांनी उपरोक्त कायद्याने हे हक्क व हा दर्जा अमान्य केला, पण त्याचबरोबर या स्त्रियांना आपल्या जनक आईबापाच्या मिळकतीत वारसाचे हक्क प्राप्त करून दिले. दुसऱ्या शब्दांत देवाला सोडल्यामुळे या स्त्रियांना मिळणारा समाजातील कायदेशीर दर्जाच अमान्य करण्यात येऊन देवदासी प्रथेचा पायाच उखडून टाकण्याचा महाराजांनी प्रयत्न केला.

**शाहू महाराजांच्या कायद्यांचे महत्त्व –**

शाहू महाराजांचे हे कायदे म्हणजे स्त्रियांच्या सामाजिक स्वातंत्र्याच्या रक्षणाचे कायदे होते. महाराजांचा कारभार किती पुरोगामी होता, याची साक्ष हे कायदे देतात. असे कायदे केले म्हणजे स्त्रियांवरील अत्याचार थांबले, असे म्हणता येणार नाही. कारण आजही अशाप्रकारचे कायदे अस्तित्वात असूनही स्त्रियांवरील अत्याचारांचे प्रकार थांबलेले नाहीत. असे असले तरी, शाहू महाराजांनी केलेल्या कायद्यांचे सामाजिक महत्त्व कमी लेखता येणार नाही. ज्या काळात प्रगत ब्रिटिश सरकारच्या राज्यातही स्त्रियांच्या हक्कांचे संरक्षण करणारे, असे कायदे अस्तित्वात नव्हते आणि ब्रिटिश सरकार अशा प्रकारे कायदे करून परंपरावाद्यांचा रोष ओढवून घ्यावयास तयार नव्हते, त्या काळात शाहू महाराजांनी हे क्रांतिकारी कायदे करून अमलात आणले होते, ही गोष्ट ध्यानात घेतली पाहिजे. कुटुंबामध्ये होणाऱ्या नाना प्रकारच्या क्रूर छळांतून असाहाय्य स्त्रीची सुटका करावी अथवा देवदासींसारख्या अनिष्ट व रानटी प्रथेपासून तिची मुक्तता करावी, हा विचार घेऊन स्वातंत्र्योत्तर काळात बऱ्याच उशिरा चळवळी सुरू झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर, पाऊणशे वर्षांपूर्वी या राजाने अशा स्त्रियांच्या उद्धाराचा विचार

मनात आणला व तो अमलात आणला.

**संदर्भसूची –**

१. राजर्षी शाहू छत्रपती पेपर्स खंड एक (१८८४–१८९४) संपादक डॉ. आप्पासाहेब पवार, शाहू संशोधन केंद्र कोल्हापूर, १९७८.
२. राजर्षी शाहू छत्रपती – एक समाजक्रांतिकारक राजा, धनंजय कीर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९७९.
३. राजर्षी शाहू: राजा व माणूस, कृ. गो. सूर्यवंशी, ठोकळ प्रकाशन, पुणे, १९८४.
४. लोकराजा शाहू छत्रपती, सुरेश एजन्सी, कोल्हापूर, पाचवी आवृत्ती डिसेंबर २०१०.
५. राजर्षी शाहू राजा व माणूस, कृ. गो. सूर्यवंशी, ठोकळ प्रकाशन, पुणे, १९८४.
६. राजर्षी शाहू छत्रपती जीवन व कार्य, डॉ. जयसिंगराव पवार, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, डिसेंबर २०१३.